नि.फौ.ख.क.७०/२०१९.
सरकार/ बाबाराव
नि.क.१९

**अभियोग पक्षातर्फे साक्षीदार क.<u>०३</u> यांची जबानी**

**मी याद्वारे प्रतिज्ञापूर्वक निवेदन करतो की,**

| | | |
|---|---|---|
| **माझे नाव** | **:** | **मोतन शेषराव तागडे,** |
| **वय** | **:** | **४६ वर्षे, व्यवसाय : डायव्हर,** |
| **राहणार** | **:** | **कळमेश्वर, जि. नागपूर.** |

**सरतपासणी–सहा.सरकारी अभियोक्ता कू.बी.जी.पांडे यांचेतर्फे**

मी आज रोजी न्यायालयात हजर असलेल्या आरोपीला ओळखत नाही. घटना नेमकी कूठे व काय घडली हे मला माहित नाही. पोलीसांनी मला घटनास्थळ व जप्ती पंचनामा करीता बोलाविले नव्हते. पोलीसांनी माइ–यासमक्ष पंचनाम्याची कारवाही केली नव्हती. पोलीसांनी माइ–यासमक्ष आरोपीकडून काहीही जप्त केले नाही. आता मला घटनास्थळ व जप्ती पंचनामा दाखविण्यात आला. त्यावर माझी सही आहे. त्यातील मजकूर मला माहित नाही. सहीला **<u>नि.क.२० व २१</u>** देण्यात येत आहे. पोलीसांनी माझे बयान नोंदविले नव्हते.

**<u>साक्षीदार अभियोग पक्षास समर्थन करीत नसल्याने सरकारी वकीलांच्या विनंतीवरून उलटतपास</u>**

हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ३१.०३.२०१९ रोजी अंदाजे ९:०० वाजताच्या सूमारास फिर्यादी रेखा धार्मिक व त्यांचे पती नारायण धार्मिक हे आरोपीचे घरासमोर उभे होते व दार उघड असे म्हणत होते. त्यानंतर मला माहित पडले की, आरोपीने प्रियंका धार्मिक हिचा विनयभंग केला होता. हे म्हणणे खरे नाही की, माइ–या बयानातील अधोरेखांकीत भाग 'क' माइ–या म्हणण्याप्रमाणे आहे. हे म्हणणे खरे नाही की, दिनांक ३१.०३.२०१९ रोजी पोलीसांनी मला निलडोह येथे फिर्यादीच्या राहते घरी घटनास्थळ व जप्ती पंचनाम्याकरीता बोलविले होते व माइ–यासमक्ष काचाच्या बांगडीचे दोन तूकडे जप्त केले होते. हे म्हणणे खरे नाही की, आज रोजी मी आरोपीला वाचविण्याकरीता खोटी साक्ष देत आहे.

**<u>उलटतपास – ॲड. घांगरेकर यांचे मार्फत आरोपी करीता</u>**

**नाकारला.**

वा.दा.ब.अ.क. केले. माझे समक्ष,

न्या.दं.प्र.श्रे., हिंगणा.
हिंगणा. ( अल अमूदी ए.के. )
दि.१३.०१.२०२२. न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
हिंगणा.